## शिक्षण विभाग पंचायत समिती कुडाळ

### 1.उपस्थिती भत्ता योजना

शासनाने 3-1-92 या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यंाच्या जन्मदिनी सुरु करण्यात आलेली आहे.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याबाबतचे धोरणानुसार प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठीचे इयत्ता 1 ली ते 4 मधील शाळेत जाणा-या अनुसुचित जाती ,भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेतील विद्यार्थीनीना नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन प्रत्येक मुलीमागे 1 रु. या दाराने रक्कम रु.220/- च्या मर्यादेत देवुन योजना राबविली जाते.

शाळेत जाणा-या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्या साठी प्रतिदिन 1रु. प्रमाणे वार्षिक र.रु.220/-प्रमाणे अनुदान वितरीत केले जाते.

### 2. सावित्रिबाई फुले दत्तक पालक योजना

सन 1993-94 पासून महाराष्ट्र राज्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक सुधारणासाठी बांधिलकी स्विकारुन स्वखर्चाने मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सेवाभावी पालकंाच्या मार्फत सावित्रिबाई फुले दत्तक पालक योजना सुरु केलेली आहे. गरजु व होतकरु मुलींना शिक्षणासाठी हातभार लावण्याची मोठया प्रमाणात चळवळ उभी करण्याचे दृष्टीने सुरु केलेली आहे. प्रति विद्यार्थीनी रक्कम रु.3,000/- देणगी स्विकारली जाते. त्या देणगीमधुन मासिक रु.30/- किंवा वार्षिक रु.360/- विद्यार्थीनीना ग्रामशिक्षण समितीमार्फत दिले जाते. सदरची योजना 1993-94 पासुन सुरु करण्यात आलेली आहे.

सामाजिक व शैक्षणिक सुधारणासाठी बांधिलकी स्विकारुन स्वखर्चाने मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने देणगी रु.3000/- स्विकारले जातील.

### 3.शालेय पोषण आहार योजना अन्न शिजवून देणे (इयत्ता 1 ली ते 5 वी)

1.म.शासन शा. शि. विभागा कडील दिनंाक 16 मे 2002 चे शा नि. या योजने अंतर्गत 2002-2003 या शैक्षणिक वर्षापासून इयता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांना शिजवून अन्न देणे.

2.सदरची योजना जि.प.प्राथमिक शाळा, अनुदानित खा.प.शाळा, अनुदानित माध्यमिक शाळा, वस्तीशाळा,महात्मा फुले शिक्षण हमी शाळांमधील इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांना लागू करणे.

3. प्रति विद्यार्थी प्रती दिनं 100 ग्रॅम प्रमाणे एकूण उपस्थितीच्या प्रमाणात दरमहा तांदुळ शिजवून दिला जातो. तसेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे व उपस्थितीचे प्रमाण वाढविणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारणे. यासाठी योजना राबविली जाते. तसेच प्रतिदिन प्रति विद्यार्थी केंद्र/राज्य हिस्सा र.रु. 2.08 प्रमाणे अन्न शिजवून देणेसाठी मानधनावर खर्च केला जातो.

### 4.प्राथ शाळा क्रीडा स्पर्धा (जि.प.स्वउत्पन्नतून सदरची योजना)

प्राथ शाळा क्रीडा स्पर्धा ही जि.प.स्वउत्पन्नतून सदरची योजना राबविली जाते. सदरची योजना 1998.99 पासुन सुरु करणेत आलेली आहे.सदर योजनेची अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत:-

1.शालेय विदयार्थ्यांच्या सुप्त क्रीडा, कला, अभिनय व बोदधीक क्षमतेला संधी देणेसाठी.

2.व त्याचा विकास होणच्या दृष्टीने व त्यांचे गुणांचे कौतूक व प्रौत्साहन देण्ेा या हेतूने सदरची योजना शिक्षण विभागातर्फे सुरु करणेत आली.

3.सदरची योजना जि.प.प्रशासन,पालक,समाज व सामाजिक बांधिलकीने काम करणारे लोक यांचे सहकार्यातून यशस्विरीत्या पार पाडली जाते.

4.सदरची योजना केंद्र स्तर,प्रभाग स्तर,तालूका स्तर व जिल्हा स्तर अशा प्रकारे आयाजित केली जाते.

5.स्पर्धेत यशस्वी विदयार्थ्यांचा प्रमाणपत्र व शिल्ड देवून गौरव केला जातो. तसेच सर्व गटांतून सर्वसाधारण विजेता व उपविजेता अशी पारीतोषीके दिवून स्पर्धकांचा व गटांंचा गौरव केला जातो.